**प्रादेशिक योजना - पुणे**
**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हददीमधील प्रस्तावित ११० मी. रिंग रोडच्या आखणीत बदल करणेबाबत.**
**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २०(३) अन्वये फेरबदल प्रस्तावाची सूचना...**

## महाराष्ट्र शासन

**नगर विकास विभाग, मंत्रालय.**
**शासन निर्णय क्रमांक :- टिपीएस १८१६/३०९/प्र.क्र.४१३/१६/नवि-१३**
**दिनांक:-०८/०६/२०१८.**

**शासन निर्णय** :- सोबतची शासकिय **सूचना** महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(रा.म.पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत :-१) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रति :-

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे - त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची सूचना शासनाच्या दि.१३/०९/२०१० रोजीच्या परिपत्रकातील निदेशानुसार व खालील सूचनांप्रमाणे जाहिरात म्हणून प्रसिध्द करुन घेणेबाबत सत्वर कार्यवाही करावी.

| | | |
|---|---|---|
| १ | जाहिरात देणा-या कार्यालयाचे नांव | सहसंचालक, नगररचना, पुणे विभाग, पुणे |
| २ | जाहिरात कोणत्या दिनांकापर्यंत द्यावयाची आहे. | तात्काळ |
| ३ | प्रसिध्दीचे स्वरुप | स्थानिक |
| ४ | कोणत्या जिल्ह्यामध्ये | पुणे जिल्ह्यामध्ये |
| ५ | किती वृत्तपत्रात | एका मराठी व एका इंग्रजी वृत्तपत्रात |
| ६ | वृत्तपत्राचे नांव | सर्वाधिक खपाच्या वृत्तपत्रात |

| | | |
|---|---|---|
| ७ | कितीवेळा | एकदा |
| ८ | जाहिरात खर्चाचे देयक कोणत्या अधिकाऱ्याकडे पाठवावयाचे त्या कार्यालयाचे नांव व संपूर्ण पत्ता | महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी अदा करावे. |

३) विभागीय आयुक्त, पुणे.

४) जिल्हाधिकारी, पुणे.

५) महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

/- त्यांना विनंती करण्यात येते की उक्त प्रस्तावित फेरबदल दर्शविणारे रिंग रोडचे भाग नकाशे अधिप्रमाणित करण्यासाठी ५ प्रतीत स्वतंत्रपणे शासनास सादर करावेत.

६) आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे.

७) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग,पुणे.

८) सहायक संचालक, नगर रचना, पुणे.

९) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, येरवडा, पुणे.

/- त्यांना विनंती करण्यांत येते की, सोबतची शासकीय सूचना महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्रामध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी १० प्रती या विभागास पाठवाव्यात.

१०) कक्ष अधिकारी (नवि-२९) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

/-त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची सूचना या विभागाच्या बेवसाईटवर प्रसिध्द करावी.

११) निवड नस्ती (नवि-१३)

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

# सूचना

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई-३२**
**दिनांक :०८/०६/२०१८**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**

क्रमांक:- **टिपीएस-१८१६/३०९/प्र.क्र.४१३/१६/नवि-१३:-** ज्याअर्थी, शासनाने नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-१८९५/२२७/प्र.क्र.२६/१५/नवि-१३, दिनांक २५ नोव्हेंबर, १९९७ अन्वये पुणे जिल्ह्याची प्रादेशिक योजना (यापुढे जिचा उल्लेख "उक्त प्रादेशिक योजना" असा करण्यात आलेला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आलेला आहे) अन्वये मंजूर केली असून ती दिनांक १० फेब्रुवारी, १९९८ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाची नगर विकास विभागाची अधिसूचना क्र.टीपीएस-१८१६/३०९/ प्र.क्र.४१३/१६/नवि-१३, दि.१७/०३/२०१७ व दि. ०८/०६/२०१८ अन्वये प्रादेशिक योजना क्षेत्रामध्ये पुणे-पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर ११० मी. रुंदीचा वळण रस्त्याचा प्रस्ताव उक्त अधिनियमाचे कलम-२० (४) अन्वये मंजूर केले असून त्यासाठी **पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण हे समूचित प्राधिकरण आहे** (यापुढे जीचा उल्लेख "**उक्त प्राधिकरण**" असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअथी, उक्त वळण रस्त्याचा फेरबदल प्रस्ताव मंजूर करताना स.नं.५७,६२ मौजे मारुंजी या ठिकाणी वळण रस्त्याच्या आखणीमध्ये नकाशात विवक्षीत प्रमाणे दर्शविल्यानुसार बदल करणे आवश्यक आहे, असे दिसून आलेले आहे(यापुढे "**उक्त जमीनी**" म्हणून संबोधण्यात आलेल्या);

आणि ज्याअर्थी, उक्त फेरबदल करणे आवश्यक असल्याची शासनाने आवश्यक ती खात्री केल्यानंतर उक्त प्रादेशिक योजनेमध्ये सदर बदल दर्शविण्याकरीता उक्त अधिनियमाच्या कलम-२०(२) मधील तरतूदीनुसार उक्त प्रादेशिक योजनेमधील उक्त वळण रस्त्याच्या आखणीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "**उक्त प्रस्तावित फेरबदल**" असा करण्यात आला आहे);

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम २० पोट-कलम (३) मधील तरतूदीप्रमाणे उक्त प्रादेशिक योजनेत **उक्त प्रस्तावित फेरबदल** करण्याचा हेतू शासन याव्दारे घोषित करीत आहे. आणि त्याकरीता प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने काही सूचना / हरकती द्यावयाच्या असतील तर त्या नागरीकांनी ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनाकांपासून ३० (तीस) दिवसांचे आत सह संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे सर्व्हे नं. ७४/२, सारंग सोसायटी, सहकार नगर, पुणे यांचे नावे लेखी स्वरुपात कारणांसह पाठवाव्यात. प्राप्त होणाऱ्या सूचना / हरकतींवर सुनावणी देणेसाठी व त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. प्रस्तावित फेरबदलाची नोटीस महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI-32

F:\pune\Pune Dist\Ring Road\section_२०__३_ New.doc

झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आत प्राधिकृत अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेल्या सूचना / हरकतींचाच शासनाकडून विचार केला जाईल;

प्रस्तुतची सूचना नागरिकांच्या अवलोकनार्थ कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत खालील कार्यालयात उपलब्ध करण्यात यावी :-

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे

२) महानगर आयुक्त, पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण, औध, पुणे

३) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.

सदरहू सूचना शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे व नियम) या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32

(रा.म.पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

F:\pune\Pune Dist\Ring Road\section_२०__३_ New.doc

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT,**
**MANTRALAYA, MUMBAI - 400 032.**
**DATE:- 08/06/2018.**

## NOTICE

**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966**

Maharashtra Regional & Town Planning Act 1966

**No. TPS 1816/309/CR-413/16/UD-13** - Whereas, the Government in the Urban Development Department vide Notification **No.** TPS 1895/227/CR-26/95/UD-13, dated the 25th November, 1997 has sanctioned the Regional Plan for Pune District (hereinafter referred to as 'the said Regional Plan') under Section 15 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as **"the said Act"**) so as to come into force with effect from the 10th February, 1998;

And whereas, Government in the Urban Development Department vide Notification No.TPS 1816/309/CR-413/16/UD-13, dated 17 March 2017 and dated 08/06/2018 has sanctioned the modification under section 20 (4) of the said Act in respect of alignment of 110mtr wide Ring Road for which the ***"Pune Metropolitan Region Development Authority"*** is the Appropriate Authority (hereinafter referred to as ***"the said Ring Road"*)**;

And whereas while approving the modification for the said Ring Road under Section 20(4) of the said Act, it is noticed that some changes are necessary in the sanctioned alignment of the said Ring Road proposed in S.No.57 & 62 of mouje Marunji more specifically as shown on plan (hereinafter referred to as **"the said land"**);

And whereas, in view of the above required changes and after making necessary enquiries, the Government of Maharashtra is of the opinion that it is necessary to modify the alignment of the said Ring Road in the said land as shown on plan and decided to modify the said Regional Plan as per the provisions of Section 20(2) of the said Act (hereinafter referred to as "the said Proposed Modification")

Now therefore, as provided in sub-section 3 of Section 20 of the said Act, the Government hereby declares its intention to make **the said proposed modification** and for that purpose, invites suggestions and / or objections from any person with respect to the proposed modification. Suggestions and / or objections in this regard shall be submitted to the Divisional Joint Director of Town Planning, Pune Division, Pune who is hereby appointed as the "Officer" for giving hearing in respect of the suggestions and / or objections received in this regard and submit his report to the Government. Suggestions and / or objections received by the Divisional Joint Director of Town Planning, Pune Division, Pune within a period of 30 (thirty) days from the date of publication of this Notice in the Official Gazette will only be considered;

This Notice shall be made available for inspection to the general public during office hours on all working days at the following offices:-

(i) Office of the Director of Town Planning, Central Building, Pune-411001.

(ii) Office of the Joint Director of Town Planning, Pune.

(iii) Metropolitian Commissiner PMRDA, Pune.

This Notice shall also be published on the Government website www.maharashtra.gov.in
(कायदे व नियम)

By order and in the name of Governor of Maharashtra,

**(R.M.Pawar)**
**Under Secretary to Government**